# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांकः06.09.2024** **वारःशुक्रवार**

---

**प्राणप्रतिष्ठा**

सनई चौघड्याच्या स्वरात तसेच बँडच्या सूरावटीत आणि ढोलताशाच्या गजरात, उद्या शनिवारी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पुण्यातील मानाच्या गणपतींची विधिवत प्राणप्रतिष्ठापना होणार आहे.

**पोलिस**

गणेशोत्सवासाठी बंदोबस्त करण्याकरिता सात हजार पोलिस तैनात असणार आहेत. विसर्जनासाठी ही संख्या आणखी वाढवण्यात येणार आहे. यामध्ये 4 अतिरिक्त पोलिस आयुक्त, 10 पोलिस उपायुक्त, 23 सहायक पोलिस आयुक्त, 128 पोलिस निरीक्षक, 568 सहायक पोलिस निरीक्षक, 4604 अंमलदार, 1100 गृहरक्षक दलाचे जवान, राज्य राखीव पोलीस दल, शीघ्र कृती दलाच्या तुकड्या यांचा समावेश असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी आज दिली.

गणेशोत्सवासाठी 1742 नागरिकांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. 12 ते 17 सप्टेंबरपर्यंत एकूण सहा दिवस सकाळी सहा ते रात्री बारा या कालावधीत ध्वनिवर्धक् वापरण्यास परवानगी आहे. पण फटाके वाजवण्यास मात्र मनाई आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहराच्या मध्यवर्ती भागातील अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद तर अनेक रस्ते अवजड वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असून गरज पडल्यास ऐनवेळी वाहतुकीत बदल करण्यात येणार आहे.

**'ग्लोबल गणेश फेस्टिवल**

'लोकसहभाग, तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर, गणेशोत्सवादरम्यान परदेशी लोकांना आवश्यक सुविधा, मार्गदर्शन, जागतिक स्तरावर आयोजित होणाऱ्या गणेशोत्सवाला जोडून घेत उत्सवाचं आदानप्रदान

झालं तर ऐतिहासिक परंपरा असलेला गणेशोत्सव जागतिक लोकोत्सव होईल," अशा भावना गणेशोत्सवातील सक्रिय कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत. पहिल्यांदाच होत असलेल्या 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'च उद्घाटन परदेशी तरुणांच्या हस्ते काल पुण्यात करण्यात आलं.

**मेट्रो**

गणेशोत्सव काळात मेट्रोच्या वेळात बदल करून मेट्रोची प्रवासी सेवा मध्यरात्रीपर्यंत सुरू ठेवण्यात येणार आहे. तसेच फेऱ्यांच्या संख्येतही वाढ करण्यात येणार आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी 17 आणि 18 सप्टेंबर रोजी सकाळी 6 ते दुसऱ्या दिवशी सकाळी 6 पर्यंत मेट्रो सेवा सुरू राहणार आहे. तर 7 ते 9 सप्टेंबर दरम्यान सकाळी 6 ते रात्री 11.00 यावेळेत, 10 सप्टेंबर ते 16 सप्टेंबर दरम्यान सकाळी 6 ते रात्री 1 पर्यंत मेट्रो सेवा सुरू ठेण्यात येणार आहे. पुणे मेट्रोनं ही माहिती दिली आहे.

**सायकल**

पुणे महापालिकेच्या वतीनं सायकलला प्रोत्साहन देण्यासाठी आणि वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून 'एकात्मिक सायकल आराखडा' तयार करण्यात आला असून तो विकास योजनेत समाविष्ट केला जाणार आहे. त्यासाठी हा आराखडा राज्य सरकारकडे पाठवला जाणार आहे. याबाबतच्या प्रस्तावाला नुकतीच महापालिकेच्या शहर सुधारणा समितीनं मान्यता दिली आहे.

**कॅमेरे**

पुणे शहराच्या विविध भागांत बसविण्यात आलेले 1054 सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. या कॅमेऱ्यांच्या दुरुस्तीचे काम पुणे महापालिकेच्या विद्युत विभागानं हाती घेतलं आहे.

**आवाहन**

यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक तसंच शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व गणेश मंडळांनी आणि नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावं, असं आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखरसिंह आणि पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केलं आहे. शाडू माती,

धातू, लाकूड, दगड, तुरटी अथवा कागदाच्या लगद्यापासून तयार करण्यात आलेली गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

दरम्यान

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने  महापालिका शाळांतील इयत्ता 5 वी 10 वीतील विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती आणि  सजावट' या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**आव्हाड स्मृती पुरस्कार**

प्रा. मिलिंद जोशी यांची लेखन आणि वक्तृत्वशैली अनोखी आहे. त्यांनी साहित्य परिषदेला लोकाभिमुख केलं. असे गौरवोद्गार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलानाचे माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी काढले.

आडकर फौंडेशनतर्फे ॲड. भास्करराव आव्हाड स्मृती पुरस्कार प्रा. मिलिंद जोशी यांना डॉ. मोरे यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आला.त्यावेळी  ते बोलत होते .

**नेत्रदान पंधरवडा**

पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या वतीनं 39 व्या राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्यानिमित्त विशेष कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रम सुरू असून याचा समारोप येत्या रविवारी सकाळी 10 वाजता टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलमधील गणेश सभागृहात होणार आहे, अशी माहिती संघटनेच्या अध्यक्ष डॉ. राधिका परांजपे यांनी दिली.

**क्रिकेट**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने मान्सुन करंडक' 19 वर्षाखालील आंतरक्लब टी-20 क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेत एलिट ईगल्स् संघाने एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीचा 19 धावांनी पराभव केला. अन्य दुसऱ्या सामन्यात एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा 67 धावांनी पराभव केला.

**हॉकी**

हॉकी महासंघाच्या मान्यतेने चौथी हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय स्पर्धा पुण्यात सुरू आहे. आज सकाळच्या सत्रात गतविजेत्या पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघाने आपली विजयी घोडदौड कायम राखत भारतीय क्रीडा प्राधिकरण संघावर चार तीन असा निसटता विजय मिळवला. अन्य दुसऱ्या सामन्यात केंद्रीय सचिवालय संघाने थेट कर संकलन केंद्रीय मंडळ संघावर 3-2 अशा फरकाने मात केली. सकाळचा सत्र रेल्वे मंडळ संघाने गाजवत कॅनरा बँकेचा 14-0 असा धुवा उडवत वर्चस्व राखले.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारतीच्या पुणे केंद्रतावर संध्याकाळी 6.00 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**